**CNR :- MHSI100000072019**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ०२/२०१९ :–

## –: निशाणी १३४ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ४३ चे कायदेशीर वारसांना दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करुन सामील करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४३ करुणा किशोर पार्सेकर ही मयत झाली असून तीला मुलबाळ कोणीही नसल्याने पती हा कायदेशीर वारस आहे.

प्रतिवादी क्र. ४३ – करुणा किशोर पार्सेकर (मयत वारस)
प्रतिवादी क्र. ४३अ) श्री. किशोर पार्सेकर,
वय सु. ३७ वर्षे, धंदा – शेती,
रा. मांजरे, ता. पेडणे, जि. उत्तर गोवा.

वरील प्रमाणे प्रतिवादी क्र. ४३ यास वारस आहेत. याकामी प्रतिवादी क्र. ४३ चे वारस मुदतीत दाखल करावयाचे होते. परंतु, प्रतिवादी क्र. ४३ ही मयत असलेची बाब रजि.ए.डी. लखोटा 'सदर मालक मयत' असा शेरा मारुन परत आल्याने कळाली. परंतु प्रतिवादी क्र. ४३ चे वारसांची माहिती व पत्ते वादी यांना वेळेत उपलब्ध होऊ शकले नाहीत त्या कारणे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब झाला. सदरचे वारस अभिलेखासदरी सामील करुन तशी दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. ४३ च्या वारसांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. ४३ च्या वारसांना पुरेशी संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत दाखल न केल्याने त्यांच्या विरुद्ध ''म्हणणे नाही'' चा आदेश पारीत करण्यात येत आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादी क्र. ४३ चा मृत्यू झाल्याचे नि.क्र. ११३ वरील रजि. ए.डी.च्या लखोट्यावरुन दिसून येते. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ४३ यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

**प्रतिवादी क्र. ४३ – करुणा किशोर पार्सेकर (मयत वारस)**
**प्रतिवादी क्र.४३अ)श्री. किशोर पार्सेकर,**
**वय सु. ३७ वर्षे, धंदा – शेती,**
**रा. मांजरे, ता. पेडणे, जि. उत्तर गोवा.**

०६. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र.४३ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ४३ यांचे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब केलेला आहे. विलंबाचे दिलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. ४३ चे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधी होणार आहे. अर्ज नामंजूर केल्यास

अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.२००/– (रुपये दोनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी १३४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.२००/– (रुपये दोनशे मात्र) भरुन; प्रतिवादी क्र. ४३ चे वारसांना प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात समाविष्ट केल्यावर तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाची रक्कम रु.२००/– (रुपये दोनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.02.10 16:08:46 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०९.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.